# महाराष्ट्र शासन

<u>अत्यंत तातडीचे</u>

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉप्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- १६ मार्च २०२०

प्रति,

अपर मुख्य सचिव, (शालेय शिक्षण),
अपर मुख्य सचिव (कौशल्य विकास)
सचिव, (उच्च व तंत्रशिक्षण)
मंत्रालय, मुंबई
संचालक, शालेय शिक्षण, पुणे / उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई
जिल्हाधिकारी (सर्व)
पोलीस अधिक्षक (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

**विषय: राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.. (ग्रामीण क्षेत्रातील सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवणेबाबत)..**

**संदर्भ : १. शासन समक्रमांकाचे दि.१४ मार्च,२०२० रोजीचे पत्र.**
**२. शासन समक्रमांकाचे दि.१५ मार्च,२०२० रोजीचे पत्र.**

उपरोक्त संदर्भाधीन पत्र क्रमांक १ अन्वये करोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात आले आहे.

त्यानंतर संदर्भाधिन पत्र क्रमांक २ अन्वये महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या अशा मोठया शैक्षणिक संस्था दि.३१ मार्च,२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

आता, ग्रामीण क्षेत्रातीलसुध्दा सर्व जिल्हा परिषद, सरकारी व खाजगी शाळा / महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था म्हणजेच महाराष्ट्र राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था हया, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने, दिनांक ३१ मार्च २०२० पर्यत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

तथापि, सर्वच क्षेत्रात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या अनुषंगाने १० व १२ च्या परिक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्या असाही निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच विश्वविद्यालयाच्या परिक्षांसंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून कार्यवाही करण्यात येत असून त्याबाबतच्या सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधीत संस्था प्रमुखास देण्यात याव्यात.

तरी उपरोक्तनुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(डॉ. प्रदीप व्यास)
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रत विभागीय आयुक्त, (सर्व)
प्रत आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई
प्रत संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे
प्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्रत मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
प्रत मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
प्रत मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव